# प्रकरण पाचवे

# प्रकरण पाचवे.

## उपसंहार -

**भाग एक :** १९८० ते १९८९ मध्ये भारतातील सार्वत्रिक निवडणुकांत सहभागी झालेल्या राजकीय पक्षांचा तुलनात्मक अभ्यास करतांना राजकीय पक्षानी स्वीकारलेली ध्येयधोरणे आणि कार्यक्रम यांना १९८०, १९८४ आणि १९८९ निवडणुकीतील राजकीय पक्षांच्या यशापयशावर कितपत परिणाम झाला हे तपासून पहातांना पहिल्या प्रकरणात १९५२ पासून १९७७ पर्यंतच्या सार्वत्रिक निवडणुकीत राजकीय पक्षांनी जाहिर केलेल्या भूमिकांचा संक्षिप्तपणे आढावा घेतला. त्यामध्ये असे आढळून आले की, पहिल्या तीन निवडणुकांमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले याचे कारण म्हणजे काँग्रेसला लाभलेला स्वातंत्र्य चळवळीचा वारसा आणि नेहरुंचे प्रभावी व्यक्तीमहत्व हेच काँग्रेसच्या यशाचे गमक होते, परंतु त्यानंतरच्या काळात काँग्रेसमध्ये फूट पडून अनेक गटांनी आपापले पक्ष स्थापन केले व त्यामधून काँग्रेसला पर्याय देण्याचा प्रयत्न झाला. या सर्व पार्श्वभूमीतून स्पष्ट होते की, पहिल्या तीन निवडणुकांमध्ये जाहिरनाम्यांच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर कोणतीही विशेष समस्या नव्हती, सर्वांचे लक्ष काँग्रेस पक्षाकडे केंद्रीत झालेले होते. लोकसभेची चौथी, पाचवी आणि सहावी, ह्या तीन सार्वत्रिक निवडणुका विशेष राष्ट्रीय समस्यांवर लढविल्या गेल्या त्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेत विचारप्रणालीचा अंगीकार केलेला स्पष्ट होतो. याच काळात राजकीय विचारप्रणालीचे ध्रुवीकरण झालेले दिसते की ज्यामुळे भारतीय राजकारणात तीन महत्वाचे घटक निर्माण झाले त्यामध्ये उजव्या विचारसरणीचा जनता पक्ष, डाव्या विचारसरणीचे कम्युनिस्ट पक्ष आणि केंद्राकडून डाव्या विचारप्रणालीकडे काँग्रेसचा कल दिसतो.

दुसऱ्या प्रकरणात १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत राजकीय पक्ष आणि त्यांनी स्वीकारलेली भूमिका यांचा तुलनात्मक अभ्यास करतांना असे दिसून आले की या निवडणुकीत जाहिर केलेल्या सामाजिक, आर्थिक राजकीय धोरणात सर्वच पक्षात काही किरकोळ फरक वगळल्यास मतैक्य असलेले आढळून आले. जाहिरनाम्यातील राजकीय धोरणांचा विचार केल्यास जनता सरकारचा अकार्यक्षम कारभार, पक्षातील मतभेद आणि त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यात आलेले अपयश यावर मात करण्याचा सर्वच राजकीय पक्षांनी प्रयत्न केलेला दिसतो परंतु काँग्रेस(इ) पक्षाप्रमाणे धोरण असले तरी त्यांना या निवडणुकीत स्थिरता आणि एकता स्थापन करण्याची हमी दिली. त्याचप्रमाणे काँग्रेसकडे कुशल नेतृत्व व पक्षशिस्त होती या सर्व राजकीय परिस्थितीचा फायदा काँग्रेसला मिळाला असे आढळून आले. सामाजिक धोरणाच्या बाबतीत सर्वच राजकीय पक्षांची समान भूमिका असल्याचे स्पष्ट होते विशेषता धर्मनिरपेक्षता, मागासवर्गीय, आदिवासी, स्त्रिया, मुले, आरोग्य या बद्दलच्या धोरणात सर्वच पक्ष दिशेच्या बाबतीत समानता बाळगून आहेत. सामाजिक धिकारासाबाबत त्यांच्यात ऐक्य असल्याचे दिसून आले. जनता राजवटीत सामाजिक असंतोष पसरला होता, सर्वत्र धार्मिक, जातीय तणाव वाढले त्यामुळे सामाजिक स्वास्थ प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने आपापल्या जाहिरनाम्यात सर्वच राजकीय पक्षांनी सामाजिक सुरक्षितेची हमी दिली परंतु याचा परिणाम फार थोडया प्रमाणात झालेला दिसून येतो.

१९८० च्या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षानी परिणामकारक आर्थिक घोषणा केलेल्या दिसतात. जनता सरकारच्या काळात औद्योगिक उत्पादन घटले वस्तूंच्या किंमती वाढल्या, मीठासारख्या जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा भासला, नियोजनांत अकार्यक्षमता या सर्व समस्यांना तोंड द्यावे लागले म्हणूनच या निवडणूकीत आर्थिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने सर्वच पक्षांनी आकर्षक आर्थिक कार्यक्रमांचा अवलंब केला. या सर्व

राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यात समानता आढळते परंतु मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आर्थिक व्यवस्थेची साम्राज्यवाद्यांच्या मदतीतून सुटका आणि लोकदलाची गांधीवादी अर्थव्यवस्था, जनता पक्षाची बेकारांना बेकार भत्ता देण्याची हमी, मतदारांना आकर्षित करू शकले नाहीत. त्याचप्रमाणे कॉंग्रेस [आय], जनता पक्ष, भारतीय लोकदल यांच्या जाहिरनाम्यातील कररचनेसंबंधीचे धोरण मात्र समाजातील विशिष्ट वर्गासाठी आकर्षक ठरले.

परराष्ट्रीय धोरणाच्या बाबत या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी समान भूमिका घेतलेली दिसते.

थोडक्यात १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत सहभागी झालेल्या राजकीय पक्षांचा धोरणात्मकदृष्टया तुलनात्मक विचार केला तर या निवडणुकीत कोणत्याही पक्षाचे राजकीय, सामाजिक व आर्थिक धोरण प्रभावित ठरलेले नाही, मात्र जनता पक्षाचा अकार्यक्षम कारभार हेच त्यांच्या पराभवाचे कारण ठरले आणि कॉंग्रेसची परंपरा, एकता, अखंडता आणि सुरक्षिततेचे आवाहन हे कॉंग्रेसच्या यशस्वीतेस कारणीभूत ठरले असा निष्कर्ष काढता येईल.

१९८४ च्या सार्वत्रिक निवडणुकीचा राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्याच्या आधारे तुलना करता याही निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी आकर्षक ध्येयधोरणे आणि कार्यक्रम जनतेसमोर ठेवले होते. प्रस्थापित परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी राजकीय, सामाजिक व आर्थिक कार्यक्रमांची योग्य बांधणी राजकीय पक्षांकडून केली त्यामध्ये १९८० ते १९८४ या काळात घडलेल्या आर्थिक सामाजिक व राजकीय समस्या पुढील काळात संपुष्टात येतील या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या जाहिरनाम्यातून

सुधारणावादी धोरणाचा अवलंब केला. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांची तुलना करता अनेक राजकीय समस्यांची छायाही पक्षांच्या जाहिरनाम्यावर पडलेली दिसते. पंजाबचा प्रश्न, अनेक प्रादेशिक कारवाया यावर सर्व पक्षांनी आपले लक्ष केंद्रित केले. परंतु निवडणुका तोंडावर आल्या असता पंजाबी अतिरेक्यांनी श्रीमती इंदिरा गांधींची हत्या केली त्यामुळे सहानुभूतीच्या वातावरणात या निवडणुका झाल्यामुळे अनेक राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्याकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते.

या निवडणुकीसाठी स्वीकारलेल्या सामाजिक धोरणाचा तुलनात्मक विचार केला तर सर्वच पक्षांची धोरणे सारखी दिसतात. सामाजिक विकासासाठी धर्मनिरपेक्षता, मागासवर्गीय, स्त्रिया, मुले, आरोग्य याबाबत पक्षांच्या विचारसरणीत थोडाफार फरक दिसत असला तरी त्यांचे उद्दिष्ट एकच असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने भाजपचे समान नागरी कायदा, दलित मजदूर किसान पक्ष व जनता पक्ष यांचे मंडळ आयोगाच्या अंमलबजावणीचे आश्वासन ही धोरणे निश्चित मतांवर प्रभाव पाडणारी होती परंतु भावनिक वातावरणामुळे या गोष्टी प्रभावहिन ठरल्या.

~~या निवडणुकीत राजकीय पक्षांनी स्वीकारलेल्या आर्थिक धोरणाचा~~ तुलनात्मक विचार केला तर गरीबी निर्मुलन, कृषी विकास, रोजगार निर्मिती याबाबतीत सर्वच पक्षामध्ये एकवाक्यता दिसून येते, परंतु कॉंग्रेसचे उद्योगधंद्यातून प्रगती, जनता पक्षाचे चैनिच्या वस्तूवर मर्यादा, भाजपचे स्वदेशीवर भर व उद्योगधंद्यांना मोकळीक, भा.क.प. कुटीरोद्योगांना प्राधान्य तर माकप राष्ट्रीयीकरणावर भर, याप्रकारे वेगळ्या पद्धतीची आर्थिक आश्वासने दिली. परंतु इंदिरा गांधींच्या हौतात्म्यामुळे निर्माण झालेल्या भावनिक वातावरणापुढे ही सर्व आर्थिक आश्वासने प्रभावहिन ठरली.

परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतीत सर्व राजकीय पक्षांचे कार्यक्रम व धोरणांची बांधणी समान असल्याचे दिसून येते.

१९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील राजकीय पक्षांची तुलना करता या निवडणुकीत सहभागी झालेल्या सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या धोरणात व्यापक स्वरूपाच्या धोरणांचा पुरस्कार केला आहे. राजकीय धोरणामध्ये देशाची एकता आणि अखंडता राखणे, धर्मनिरपेक्ष तत्वाचे पालन, लोकशाही मूल्यांची जपणूक, दूरदर्शन व आकाशवाणी यास स्वायत्तता याबाबतीत सर्वच राजकीय पक्षांच्या धोरणात समानता असलेली आढळते. कॉंग्रेस पक्ष वगळता सर्व पक्षांनी भ्रष्टाचार निर्मूलनावर भर दिलेला आढळला, परंतु यापेक्षा वेगळ्या धोरणांचाही अवलंब केलेला आहे. त्यामध्ये कॉंग्रेसने पंचायती व नगरपालिकांना अधिक स्वायत्तता देणे, जनता दलाची निवडणूक सुधारणा, भाजपने दिल्लीस राज्याचा दर्जा देणे, लोकपाल व लोकायुक्तांची नियुक्ती. अशाप्रकारच्या धोरणांचा वरील पक्षांनी अवलंब केला. परंतु वरील सर्व धोरणे ही कॉंग्रेस नेतृत्वाची असमर्थता भ्रष्टाचाराचे कथित आरोप, रामशिलापूजनाचे धार्मिक वातावरण निवडणूक समझोते यामुळे प्रत्येक पक्षाचे जाहिरनामे प्रभावी ठरले व त्यांमधील राजकीय घटकच मतदारांना प्रभावित करणारा घटक आहे.

सामाजिक धोरणांचा विचार करता विशिष्ट धोरणांच्या बाबतीत सर्वच राजकीय पक्षांमध्ये एकता असल्याचे आढळून येते, त्यामध्ये प्रामुख्याने जीवनावश्यक सोयी गरिबी निर्मूलन, पिण्याचे पाणी, नवीन शैक्षणिक धोरणांचा अवलंब इत्यादी सोयी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत सर्वच पक्षांमध्ये समानता आहे. याशिवाय कॉंग्रेसने मागासवर्गीयांना राखीव जागा दुर्बलांना अधिक अधिकार, जनता दलाने स्त्रिया व मागासवर्गीयांच्या विकासाची हमी, दारू दुकानांवर बंदी, आरोग्य सुविधा पुरविणे, निर्वासितांच्या संरक्षणाची हमी, भाजपने घटनेतील ३७० कलम रद्द करणे,

समान नागरी कायदा, आर्थिक निकषावर राखीव जागा, मागासले जातीयवादी शक्तींना प्रतिबंध इत्यादी स्वरूपाच्या काही वेगळ्या मुद्द्यांच्या घोषणा दिल्या आहेत. या सर्व घोषणांचा फायदा हा त्या त्या पुरस्कर्त्या पक्षावर झालेला आहे.

आर्थिक धोरणाच्या बाबतीत सर्व राजकीय पक्षांची धोरणे ही काही अंशी परंपरागत असल्याचे आढळून येते, आर्थिक स्वावलंबन, शहरी व ग्रामीण बेकारीवर मात, शेतीची प्रगती इत्यादींच्या बाबतीत सर्व पक्षामध्ये समानता आढळते. परंतु या समानतेबरोबरच काही विशिष्ट आर्थिक धोरणांचा अवलंबही राजकीय पक्षांनी केलेला आहे. त्यामध्ये काँग्रेसने बेकारी नष्ट करणार असे, जनता दलाने शेतकरी-यांची १०,००० रु. पर्यंतची कर्जे माफ करणे, परदेशी कर्जाचा बोजा कमी करणे, भाजपने विक्रीकर बंद करणे, ग्रामीण कमिशनची स्थापना, कम्युनिस्ट पक्षाने राष्ट्रीयीकरणावर भर अशा पद्धतीचे धोरण अवलंबिले. थोडक्यात या सर्व पक्षांनी स्वीकारलेली आर्थिक सुधारणांची धोरणे आहेत. त्यामध्ये जनता दलाने १०,००० रु. पर्यंत शेतकरी-यांची कर्जे माफ करण्याचे धोरण हे त्यांच्या यशस्वीतेस कारणीभूत ठरले आहे. तर भाजपने केलेला हिंदुत्ववादी धोरणाचा पुरस्कार त्यांच्या संख्येत वाढ करण्यास कारणीभूत ठरला.

परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत सर्व राजकीय पक्ष समान तत्त्वांचा अवलंब करीत असलेले दिसते.

एकंदरीत १९८०, १९८४ आणि १९८९ च्या निवडणुकांचे विश्लेषण करीत असता राजकीय पक्षांच्या विचारसरणीत थोडाफार फरक झालेला दिसून आला त्यामध्ये प्रामुख्याने -

१) <u>काँग्रेस</u> – या निवडणुकीत काँग्रेसच्या धोरणांचा अभ्यास करता काँग्रेसची विचारसरणी जास्तीत जास्त डाव्या बाजूला सरकत असलेली दिसून आली. काँग्रेसने स्थिर सरकार आणि राष्ट्रीय सुरक्षितता या तत्वावर भर दिला. त्याचबरोबर सार्वजनिक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात महत्व दिले.

२) <u>जनता पक्ष</u> – या निवडणुकीतील जनता पक्षाच्या जाहिरनाम्यातून असे स्पष्ट होते की या पक्षाने गांधीवादी समाजवाद, सत्तेचे विकेंद्रीकरण शेतीला महत्व आणि अलिप्ततावादाचे समर्थन या मुद्यांवर जास्तीत जास्त भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३) <u>भा.ज.प.</u> – या निवडणुकीच्या तुलनेत भारतीय जनता पक्षाने उजव्या विचारसरणीचा मोठ्या प्रमाणात पुरस्कार केला याचा १९८९ च्या निवडणुकीत परिणाम झालेला दिसतो. यावरून काँग्रेसला उजव्या विचारांचा पर्याय निर्माण झाला असे स्पष्ट होते.

४) <u>कम्युनिस्ट पक्ष</u> – भारतातील भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दोघांच्या जाहिरनाम्यातून असे स्पष्ट होते की, या दोन्ही पक्षांनी पुरोगामी आणि समाजवादी लोकशाहीचा पुरस्कार केला आहे.

---

थोडक्यात राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यांचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच पक्षांनी धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, घटनेचे सार्वभौमत्व या तत्वांचा एकमताने पुरस्कार केलेला आहे. १९७७ नंतर काँग्रेसचा कल केंद्राकडून डाव्या बाजूला झुकलेला दिसतो. कारण त्यांनी कल्याणकारी धोरणाचा पुरस्कार केला आहे. त्याचबरोबर उजव्या पक्षांनी आपली परंपरागत तत्वे बाजूला सारून उदारवादी धोरणांचा स्वीकार केला. जनता पक्ष आणि काँग्रेस यांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात साम्य आढळते. या काळात दोन्ही कम्युनिस्ट पक्षातील वेगळेपणा कमी झाला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आपल्या सोव्हिएट युनियनच्या बाबतच्या धोरणात फेरजुळणी केली त्यामुळे या दोन्ही पक्षात एकवाक्यता आली.

१९८९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाचा अर्थात उजव्या ताकदीचा मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. यावरुन १९८९ नंतरच्या भारतीय राजकारणात उजव्या विचारसरणीचा प्रवाह सुरु झाल्याचे दिसून येते.

<u>भाग दोन</u> : वरीलप्रमाणे राजकीय पक्ष आणि त्यांची ध्येयधोरणे आणि कार्यक्रम यांचा तुलनात्मक अभ्यास करीत असतांना १९८०, १९८४ आणि १९८९ मधील निवडणुकीत ध्येयधोरणांचा आणि कार्यक्रमांचा मतदार वर्तनावर कितपत प्रभाव पडला हे तपासून पाहण्याची आवश्यकता भासली त्यावरुन पुढीलप्रमाणे निष्कर्ष निघाला -

भारतीय मतदार वर्तणुकीबद्दल प्रा. सिरसीकर व्ही. एम. यांनी पाडलेले मतदाराचे प्रकार लक्षात घेतले तर थोड्या प्रमाणात जो छोटा घटक आहे म्हणजे परिवर्तनशील मतदार आणि गटांनी प्रभावित मतदार या दोहोंच्या बाबत मात्र जाहिरनामे धोरणे, कार्यक्रम यांचा परिणाम निश्चितपणे झालेला दिसतो. प्रा. सिरसीकरांच्या पध्दतीच्या अनुषंगाने १९८०, १९८४, १९८९ मधील निवडणुकीतील मतदानातील फरक खालीलप्रमाणे काढू.

तक्ता क्रमांक ९.

१९८० ते १९८९ मधील लोकसभा निवडणुकीतील मतदानातील फरक.

| पक्ष | टक्के मतदान. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९७७ | १९८० | फरक | १९८४ | फरक | १९८९ | फरक |
| काँग्रेस | ३४.५ | ४२.४३ | + ८ | ४८.९० | ६.४७ | ४०.७४ | - ८.१६ |
| जनता | ४४ | १८.५ | -२६ | ७.१३ | ११.३७ | १७.९३ | -१०.८० |
| भा.क.प. | ४.९ | २.६ | -२.३ | २.७० | - ०१ | २.६७ | - ०.०३ |
| मा.क.प. | ४.१ | ६.१ | + १ | ५.९० | - ०२ | ६.६८ | + ०.७० |
| भा.ज.प. | - | - | - | ७.९ | - | ११.८३ | + ४.०७ |

विश्लेषण - १९८० ते १९८९ मधील लोकसभा निवडणुकीतील महत्वाच्या राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यांचा मतदार वर्तणुकीवर परिणाम.

वरील तक्त्याप्रमाणे १९७७ ते १९८० मध्ये कॉंग्रेस पक्षाच्या मतात आठ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. ह्या आठ टक्केवाढीमुळे मोठ्या प्रमाणात कॉंग्रेस पक्षाला यश मिळाले. त्यामुळे हे आठ टक्के मतदान निर्णायक ठरले. पहिल्या प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे जनता पक्षाचे अपयश हे मात्र मुख्य कारण असले तरी जाहिरनाम्याच्या परिणामामुळे ह्या आठ टक्के परिवर्तनशील व गटांनी प्रभावित झालेल्या मतदारामुळे कॉंग्रेस पक्षाला यश प्राप्त झाले. जनता पक्षाबद्दल नाराजी ही मोठ्या प्रमाणात म्हणजे २६ टक्क्यांनी घट दिसते. त्याचप्रमाणे भा.क.प.मध्ये - २.३ टक्क्यांनी घट व माकपमध्ये फक्त १ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते.

१९८० ते १९८४ च्या निवडणुकीच्या तुलनेत कॉंग्रेस पक्षाला मतात ६.४७ टक्क्यांनी वाढ झालेली दिसते. इतर पक्षांच्या मतात घटच झालेली दिसते याचाही निष्कर्ष आपण याच पध्दतीने काढू शकतो. वास्तविक तत्कालिन राजकीय व सामाजिक परिस्थितीचा विचार करता व ज्या पध्दतीने कॉंग्रेस पक्षाने प्रचार केले ते विचारात घेता कॉंग्रेस पक्षाच्या मतामध्ये घटीचीच अपेक्षा होती, परंतू श्रीमती इंदिरा गांधींच्या बलिदानाची पार्श्वभूमी, त्यामुळे निर्माण झालेली सहानुभूतीची लाट व कॉंग्रेसने केलेले ऐक्याचे आवाहन याचा फार मोठा प्रभाव मतदार वर्तनावर पडला. १९८४ च्या निवडणुक प्रचारामध्ये कॉंग्रेसने भारतीय एकात्मतेसाठी त्याग अशी इंदिरा गांधींची प्रतिमा उभी केली यासाठी ३० अब्ज पोस्टर्स मध्ये २० अब्ज केवळ इंदिरा गांधींचीच होती. शिवाय सरकारी नियंत्रित माध्यमेसुध्दा कॉंग्रेस आयच्या प्रचारासाठी वापरण्यात आली.

यावरून असे स्पष्ट होते की, इतर पक्षांनी जरी विकासात्मक जाहिरनाम्याची घोषणा केली असली तरी त्याचा परिणाम मतदारावर न होता इंदिरा गांधींच्या बलिदानाचाच मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला दिसतो.

१९८४ ते १९८९ मधील परिस्थितीचा मतदार वर्तनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. १९८९ च्या तुलनेत कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत मिळालेले नाही. १९८४ च्या तुलनेत काँग्रेस पक्षाच्या मतामध्ये ८ टक्क्यांनी घट झाली असली तरी २१४ जागा कमी झाल्या. भाजप आणि जनता पक्षाच्या मतात वाढ झालेली दिसते. भारतीय जनता पक्षाला १६ टक्के जागा मिळाल्या व त्यांच्या मतात ४ टक्के वाढ झाली. जनता दलाने १९ टक्के मतावर लोकसभेत सुमारे २७ टक्के जागा जिंकल्या एकंदरीत जनता दल आणि भाजप या पक्षांना या निवडणुकीत फायदा मिळाला. भाजपला या निवडणुकीत फायदा मिळाला याचे कारण त्यांनी आपल्या जाहिरनाम्यात उघडपणे हिंदुत्ववादी धोरण स्वीकारले नसले तरी त्यांनी कृतीतून मात्र हिंदुत्ववादाचा अवलंब केला त्यामुळेच या निवडणुकीत मतदार त्यांच्या बाजूने प्रभावित झालेले दिसतात. जनता दलानेसुध्दा बोफोर्स तोफा व जर्मन पाणबुडी यामधील व्यवहारात झालेल्या भ्रष्टाचाराचे भांडवल करून आणि धर्मनिरपेक्ष तत्त्वाचा अवलंब करून मतदारांना प्रभावित केले त्याचा फायदा जनता दलाला झाला. भारतातील उत्तरप्रदेश, राजस्थान, हरियाना, ओरिसा या राज्यावर आपले लक्ष केंद्रीत करून जास्त जागा मिळविल्या याचा निष्कर्ष असा निघतो की, जे मतदार भाजप आणि जनता दल या दोन पक्षांना त्यांच्या ध्येय धोरणे व कार्यक्रम यांना प्रभावित होऊन त्यांना पाठिंबा दिला.

या अभ्यासासाठी जाहिरनाम्याचा प्रभाव मतदार वर्तणुकीवर कितपत पडलेला आहे हे तपासून पाहण्यासाठी रॅन्डम सॅम्पलींग पध्दतीने मुलाखती घेतल्या असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली. या मुलाखती ग्रामीण आणि शहरी अशा दोन विभागात कनिष्ठ, मध्यम आणि उच्च अशा तीन स्तरातील ५० पुरुष आणि ५० स्त्रिया या प्रमाणे घेतल्या.

जाहिरनाम्याचा मतदार वर्तनावरील प्रभाव दाखविणारा तक्ता.

तक्ता क्रमांक १०.

| | | | जाहिरनाम्याचा प्रभाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया. | टक्केवारी |
| **शहरी विभाग.** | | | | | |
| कनिष्ठ वर्ग | ५० | ५० | ०० | ०० | ०० |
| मध्यम वर्ग | ५० | ५० | १८ | १० | २८ |
| उच्च वर्ग | ५० | ५० | २० | ०५ | २५ |
| **ग्रामीण विभाग.** | | | | | |
| कनिष्ठ वर्ग | ५० | ५० | ०० | ०० | ०० |
| मध्यम वर्ग | ५० | ५० | ०८ | ०४ | १२ |
| उच्च वर्ग | ५० | ५० | ०५ | ०२ | ०७ |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, जाहिरनाम्याबद्दल शहरी भागातील कनिष्ठ वर्गातील स्त्री-पुरुषामध्ये अजिबात जाणीव नाही. मुलाखतीतून असे स्पष्ट झाले आहे की, या मतदार वर्तणुकीवर वेगवेगळ्या

घटकांचा परिणाम झालेला दिसतो. मध्यमवर्गीयांच्यामध्ये ३६ टक्के पुरुष व २० टक्के स्त्रियांमध्ये जाहिरनाम्याबद्दल माहिती दिसून आली याचे कारणही प्रामुख्याने साक्षरतास आहे. इतर मध्यमवर्गीय आहेत त्यांच्यावर जातीचा किंवा प्रादेशिक समस्यांचा परिणाम झालेला दिसतो. उच्च वर्गीयामध्ये ४० टक्के पुरुष व १० टक्के स्त्रियांमध्ये जाहिरनाम्याचा प्रभाव पडलेला दिसतो. या मुलाखतीतून असे स्पष्ट होते की, जे २५ टक्के माहिती दर्शविलेले उच्चवर्गीय स्त्री पुरुष यांनी त्यांच्या उपोगधंदा व्यवसाय यांच्या दृष्टीने जाहिरनाम्याबद्दल आणि धोरणाबाबत माहिती करुन घेतलेली दिसते.

ग्रामीण भागात शहरी भागाप्रमाणेच दृश्य आढळते. कनिष्ठ वर्गाने जाहिरनाम्याबाबत अजिबात माहिती नसल्याचे दर्शविले. मध्यमवर्गीयामध्ये १६ टक्के पुरुष व ८ टक्के स्त्रिया म्हणजेच १२ टक्के लोकांना जाहिरनाम्याबाबत माहिती आहे पण उच्चवर्गीयामध्ये फक्त १० टक्के पुरुष व ४ टक्के स्त्रिया म्हणजेच केवळ ७ टक्के ग्रामीण उच्च वर्गीय लोकांना जाहिरनाम्याबद्दल माहिती होती.

एकंदरीत ग्रामीण आणि शहरी भागातील मतदार वर्तनाचे विश्लेषण करता भारताच्या संदर्भात मतदार वर्तणूकीवर प्रभाव पाडणारे घटक वेगवेगळे आहेत. ह्या अभ्यासाच्या माध्यमातून असे स्पष्ट होते की, जाहिरनाम्याचा प्रभाव हा अतिशय अल्प अशा मतदार गटावर पडतो पण हाच छोटा गट निर्णायक ठरतो परंतू मतदार वर्तणूकीवर प्रभाव पाडणारे इतरही महत्वाचे घटक आहेत त्यामध्ये मुख्यत्वे निरक्षरता, गरिबी, जात, धर्म, भाषा, प्रादेशिक समस्या ह्यासर्व गोष्टींचा प्रभाव सातत्याने पडलेला मुलाखतीतून स्पष्ट झाले, त्यामध्ये प्रामुख्याने -

१. मतदारामध्ये ६० टक्के निरक्षरतेमुळे त्यांच्यावर माहितीचे आदान-प्रदान होत नाही त्यामुळे जाहिरनाम्याचा मतदारावर प्रभाव दिसत नाही.

२. भारतात मोठ्या प्रमाणात गरीबी असूनसुध्दा पैशाच्या लोभापायी फार कमी प्रमाणात मतदार मतदान करतांना दिसतात ही उल्लेखनिय बाब आहे पण मतदारांना उत्तेजीत करण्यासाठी राजकीय पक्ष प्रचारासाठी आर्थिक बळाचा वापर करतात.

३. प्रचार माध्यमाचासुध्दा मतदारावर प्रभाव पडलेला दिसतो. उदा. : इंदिरा गांधींच्या हत्येनंतर इंदिरा गांधींच्या नावाने कॉंग्रेसने ज्या पध्दतीने प्रचार केला त्याचा निश्चितपणे मतदानावर प्रभाव पडलेला दिसतो.

४. भारतात जातीव्यवस्था अजूनही अस्तित्वात असल्यामुळे सामाजिक स्तरात अनुसूचित जाती-जमाती या खालच्या पातळीवरच आहेत. घटनात्मक दृष्टीकोनातून आपल्या राष्ट्राचे नागरिक असल्यामुळे त्यांना आपल्या राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्याचा हक्क आहे या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, ते खऱ्या अर्थांनी आपला मतदानाचा हक्क बजावतात का? मुलाखतीतून असे स्पष्ट होते की, उच्चवर्गीयाचे वर्चस्व अजूनही आपल्या समाज व्यवस्थेत अस्तित्वात आहे आणि त्यामपध्दतीने मागासवर्गीय जातीवर त्यांचा दबाव दिसतो. विशेषतः ग्रामणी भागात मोठ्या प्रमाणात असे आढळते. जातीचा प्रभाव १९५२ च्या निवडणुकीपासून मतदार वर्तनावर आढळतो. हा घटक ग्रामीण भागात अजूनही मतदारांच्या मनावर बिंबलेला आहे. जातीच्या प्रभावाविषयी वेगवेगळ्या विचारवंतांचा वेगवेगळा निष्कर्ष असला तरी आपल्या सामाजिक व राजकिय वास्तववादी परिस्थितीत जातीचा प्रभाव अजूनही मतदारावर झालेला दिसून येतो.

५. भारतातील मतदार वर्तनावर पुरुष प्रधानता या घटकांचा फार मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. आजही भारतात कुटूंबातील प्रमुख पुरुष ज्या पक्षाला किंवा ज्या नेत्याला मते देतो त्याच पक्षाला वा नेत्याला त्या समाजातील किंवा कुटूंबातील स्त्रिया मते देतात असे मुलाखतीवरुन दिसून येते.

सर्वसाधारणपणे ग्रामीण आणि शहरी भागातील कनिष्ट वर्गीय व उच्च वर्गीय लोकांच्यामध्ये अशाप्रकारची वृत्ती दिसून आली. या स्तरातील स्त्रियां ह्या पुरुषांच्या मतावर अवलंबून किंवा त्यांनी सांगितल्याप्रमाणे मतदान करतांना दिल्याचे आढळते. परंतु ग्रामीण आणि शहरी समाजातील मध्यमवर्गीय लोकांच्या बाबतीत मात्र फरक दिसून आला. या वर्गातील ६० टक्के स्त्रियांच पुरुषांच्या सांगण्यावरुन मतदान करतात. बाकीच्या सुशिक्षित आहेत त्या स्वतःच्या मताप्रमाणे व त्यांना कोणत्या पक्षाचे नेतृत्व, कार्यक्रम यांचे महत्त्व पटले आहे त्यांनाच मतदान करतांना दिसतात. शिवाय भारतीय स्त्रिया ह्या भावनाप्रधान असल्याचे आढळून आले. १९८४ च्या निवडणूकीत इंदिरा गांधींच्या हत्येमुळे भावनेच्या आहारी जावून स्त्रियांनी काँग्रेस पक्षाला मतदान केलेले दिसून येते.

याच पध्दतीने भाषा, धर्म प्रदेशावार यांचाही मतदार वर्तनावर वेगवेगळ्या ठिकाणी प्रभाव पडलेला दिसतो. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत भाषेचा प्रभाव मतदार वर्तणूकीवर झाला. तसेच १९८९ च्या निवडणूकीत धर्माचा फार मोठ्या प्रमाणात वापर झाला. याचा परिणाम मतदार वर्तनावर निश्चितपणे झालेला दिसतो.

थोडक्यात भारतातील सार्वत्रिक निवडणुकीतील मतदार वर्तन विचारात घेता १९८०, १९८४ आणि १९८९ मधील प्रस्थापित राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती मतदार वर्तनात परिवर्तन घडविण्यास कारणीभूत ठरली परंतु त्याचबरोबर निरक्षरता, गरीबी, प्रचारमाध्यमे, जात, धर्म, पुरुषप्रधानता या सर्व घटकांचा मतदारांच्या वर्तनावर कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येतो.

जाहिरनाम्याच्या आधारावर राजकीय पक्षांचा तुलनात्मक अभ्यास करतांना आणि त्यांचा मतदार वर्तणूकीवरील प्रभाव पडताळून पाहता आपल्याला एक गोष्ट लक्षात येते की, मताचे राजकारण हे नेहमी त्या राष्ट्रांच्या राजकीय संस्कृतीच्या स्वरूपाशी निगडीत असते. भारताच्या संदर्भात विचार केला तर जातीयवाद आणि जमातवादाचे राजकारण ही राजकीय आणि सामाजिक प्रवृत्ती आपल्या राजकारणाची नवीन विचारसरणी म्हणून निर्माण होत असलेली आणि सार्थात्मक जमातवादावर आधारीत धर्माचे राजकारण उदयास आले असे १९८९ च्या निवडणूकीवरून स्पष्ट होते. यावरून असे स्पष्ट होते की जरी मोठया प्रमाणात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व याबाबत सर्व पक्षांचा समान दृष्टीकोन असला तरी राजकारणावर जातीयवाद व जमातवादाचा परिणाम झालेला आहे. जातीवाद व जमातवादाचा असाच पध्दतीने प्रभाव पडत गेला तर राजकीय पक्षांची स्वायत्तता टिकून राहणार नाही.

- संदर्भसूची -

१ अय्यर, एस.पी. ॲण्ड राजू, व्हेन द विन्ड ब्लोज इंडियाज् वॅल्ट बॉक्स रिव्हाल्यूशन, हिमालय पब्लिशिंग हाउस, बॉम्बे, १९७८.

२ अय्यर, एस.पी. ॲण्ड श्रीनिवासन् आर., स्टडीज इन इंडियन डेमॉक्रसी, अलायड पब्लिशर्स, बॉम्बे १९६५.

३ भल्ला, आर.पी., इलेक्शनस इन इंडिया, चंद ॲण्ड कं., दिल्ली, १९७३

४ भांबरी, सी.पी., द जनता पार्टी ए प्रोफाईल, नॅशनल पब्लिकेशन हाउस, दिल्ली, १९८०.

५ भोळे, बी.एल., राजकीय भारत (मराठी), अमेय प्रकाशन, नागपूर, १९७८

६ भोळे बी.एल., आणि देशपांडे ना.र. भारताचे शासन आणि राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८

७ चंदीदास, क्लार्क (इडि.) इंडिया व्होटस, ह्यूमॅनिटिज प्रेस, न्यूयॉर्क, १९६८

८ छाब्रा, हरिंदर के. स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया, सूरजित पब्लिकेशन, दिल्ली, १९७७

९ दस्तूर, ए.जे., ॲण्ड आदर्श, स्टडीज इन दि फोर्थ जनरल इलेक्शन, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, दिल्ली, १९७२

१० गोखले, आर.एम., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८.

११ घोष, संकर, पॉलिटिकल आइडियाज इन इंडिया, अलाइड पब्लिशर्स, मुंबई, १९७५.

१२ गुप्ता, डी. सी., इंडियन गव्हर्नमेंट अँण्ड पॉलिटिक्स, विशाल पब्लिकेशन, दिल्ली, १९७७.

१३ गुप्ता, आर. एल., इलेक्शन पॉलिटिक्स इन इंडिया, डिसकव्हरी पब्लिशिंग हाउस, दिल्ली, १९८५.

१४ गुप्ता, आर. एल., पॉलिटिक्स ऑफ कमिटमेंट, त्रिमूर्ति पब्लिकेशन, १९७२

१५ हार्डग्रेव्ह, आर. एल., इंडियन गव्हर्नमेंट अँण्ड पॉलिटिक्स इन अ डेव्हलपिंग नेशन., ब्रेस अँण्ड वार्ड इंक, लंडन, १९७०.

१६ जोहारी, जे. सी., इंडियन गव्हर्नमेंट अँण्ड पॉलिटिक्स, विशाल पब्लिकेशन, दिल्ली, १९७७.

१७ जोशी, प. ल., भारतीय संविधान - शासन आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८८.

१८ कोठारी, रजनी (एडि.), कास्ट इन इंडियन पॉलिटिक्स, ओरिएन्ट लाँगमन, दिल्ली, १९७०.

१९ कोठारी, रजनी., पॉलिटिक्स इन इंडिया, ओरिएन्ट लाँगमन, दिल्ली, १९७०.

२० कोठारी, रजनी., पार्टी सिस्टीम अँण्ड इलेक्शन स्टडीज, एशिया पब्लिशिंग हाउस, मुंबई, १९६७.

२१ कौशिक, पी.डी., द कॉंग्रेस आइडिऑलॉजी ॲण्ड प्रोग्रॅम, आलाइड पब्लिशर्स, मुंबई, १९६४.

२२ कश्यप, सुभाष सी., द पॉलिटिक्स ऑफ डिफेक्शन, द इन्स्टिट्यूशन ऑफ कॉन्स्टिट्यूशनल ॲण्ड पार्लमेंटरी स्टडीज, दिल्ली, १९६९.

२३ कोचानेक, द कॉंग्रेस पार्टी ऑफ इंडिया, द डायनॅमिक्स ऑफ वन पार्टी सिस्टम, प्रिंस्टन, न्यू जर्सी, १९६८.

२४ माहेश्वरी, एस.आर., द जनरल इलेक्शन इन इंडिया. चैतन्य पब्लिशिंग हाऊ अलाहाबाद, १९६२.

२५ मॉरीस, जॉन., डब्लू. एच., गव्हर्नमेंट ॲण्ड पॉलिटिक्स ऑफ इंडिया, बी.पी. पब्लिकेशन, मुंबई, १९७१.

२६ मॉरीस, जॉन डब्लू एच., पॉलिटिक्स मेनली इंडियन, ओरिएन्ट लॉंगमन दिल्ली, १९७८.

२७ नरेन, इकबाल (इडि.), स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया, मीनाक्षी पब्लिकेशन, मीरत, १९६७.

२८ नरेन, इकबाल, डॉन आफ्टर ट्विलाईट, पॉलिटिकल चेंज इन इंडिया, १९७१, शिवलाल अग्रवाल ॲण्ड कं., १९७२.

२९ पोपलाई, एस. एल., (इडि.) नॅशनल पॉलिटिक्स ॲण्ड १९५७ इलेक्शन इन इंडिया, इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर, १९५७.

३० पामर, नॉर्मन डी., द इंडियन पॉलिटिकल सिस्टम, हॉग्टन मिफ्लीन, १९६१.

३१ पामर, नॉर्मन, डी., इलेक्शन ॲण्ड पॉलिटिकल डेव्हलपमेंट,
विकास पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, १९७६.

३२ भट्टाचार्य, एम्. जनरल इलेक्शन इन इंडिया, १९६२, अलाइड पब्लिशर्स,
मुंबई, १९६७.

३३ पॉल शारदा, १९८० जनरल इलेक्शन इन इंडिया, असोसिएटेड पब्लिकेशन हाऊस,
न्यू दिल्ली, १९८०

३४ श्रीधर, एस्.एल., रिव्ह्यू जनरल इलेक्शन टू लोकसभा, पब्लिश्ड फॉर
लोकसभा सेक्रेटरीएट, न्यू दिल्ली, बाय ऑथराईज्ड ॲण्ड
आय.बी.एम्. पब्लिशिंग कं., न्यू दिल्ली.

३५ सिरसीकर, व्ही. एम्., पॉलिटिकल बिहेविअर इन इंडिया, अ केस स्टडी
ऑफ १९६२ जनरल इलेक्शन, मुंबई, कलकत्ता १९६५.

३६ वेनर, एम्., इंडिया ॲट पूल्स, पार्लमेंटरी इलेक्शन ऑफ १९७७,
अमेरिकन एंटरप्राईज इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक पॉलिसी
रीसर्च, वॉशिंग्टन, १९७८.

३७ वेनर, एम्., पार्टी बिल्डींग इन अ न्यू नेशन, द इंडियन नॅशनल काँग्रेस,
युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, १९६८.

३८ वेनर, एम्., ॲण्ड जॉन ऑसगुड (इडि.), स्टडीज इन इलेक्टोरल पॉलिटिक्स
इन द इंडियन स्टेटस् द कम्युनिस्ट पार्टीज ऑफ वेस्ट बेंगॉल,
मनोहर बुक सर्व्हिस, १९७४

३९ हार्डग्रेव, मोईन., द ॲन्युअल रजिस्टर ऑफ इंडियन पॉलिटिकल पार्टीज,
१९७२-७३, ओरिएन्टालिया (इंडिया) १९७३.

जर्नलस अँण्ड न्यूज पेपर कन्सल्टेड.

१ इलेक्शन आर्काइव्हज्, इडि. साय शिवलाल.

२ इंडियन जर्नल ऑफ पॉलिटिकल सायन्स, क्वार्टरली जर्नल ऑफ इंडियन पॉलिटिकल सायन्स असोसिएशन.

३ समाज प्रबोधन पत्रिका (मराठी), समाज प्रबोधन संस्था, पुणे.

४ एशियन सर्व्हे.

न्यूजपेपर्स :

१ महाराष्ट्र टाइम्स, डेली

२ टाइम्स ऑफ इंडिया, डेली

३ हिंदू (मद्रास), डेली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR